


दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com    RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे    अंक : २६६ वा    शनिवार दि ०३ जानेवारी २०२६    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये

# बुलढाणा अर्बन बाबत मोठी अपडेट: अफवांना बळी पडू नका, वास्तव ओळखा!

## संत गजानन महाराजांच्या भूमीतील विश्वासाला धक्का देण्याचा प्रयत्न?

**जनसंचलन/बुलढाणा**


बुलढाणा अर्बन बँकेबाबत सध्या जाणीवपूर्वक आणि योजनाबद्ध पद्धतीने अफवा पसरविल्या जात असून, काही लोक गैरसमज करून घेत बँके पुढे गर्दी करत असल्याचे चित्र दिसत आहे. मात्र नागरिकांनी भावनेच्या भरात येऊन स्वतः चेच आर्थिक नुकसान करून घेऊ नये, असे ठामपणे सांगणे अत्यंत गरजेचे आहे. बुलढाणा अर्बन ही केवळ एक संस्था नसून, तो एक विश्वासाचा ब्रँड आहे. संत गजानन महाराज व राष्ट्रमाता माँ जिजाऊ पवित्र भूमी व सैलानी बाबा दर्ग्यात उभा राहिलेला हा विश्वास राधेश्याम देवकिसन चांडक उर्फ (भाईजी) व अध्यक्ष डॉक्टर सुकेश झंवर यांनी रक्ताचे पाणी करून एका रोपट्याचे वट वृक्ष केले करून दाखवले आहे. सामान्य गावातून उभा राहिलेला हा नेतृत्वाचा प्रवास आज संपूर्ण आशिया खंडात नाव कमावणारा ठरला आहे. भाईजींनी यापूर्वीच अधिकृत व्हिडिओद्वारे स्पष्ट केले आहे की, या अफवा एका हितचिंतकाने जाणून-बुजून पसरवल्या असून, ही बाब शंभर टक्के खरी आहे. माणूस मोठा झाला की त्याला खाली पाडण्यासाठी कसे डावपेच रचले जातात, हेच या प्रकारातून दिसून येते. सिटी न्यूज तर्फे सर्व नागरिकांना ठाम शब्दात सांगण्यात येतेअफवांवर विश्वास ठेवू नका. स्वतःचेही नुकसान करू नका आणि या विश्वासाच्या संस्थेचेही नुकसान होऊ देऊ नका. भाईजींच्या नेतृत्वावर १००% हमी, १००% गॅरंटी!



# बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाकडून सावित्रीमाई फुले जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन...

**जनसंचलन/बुलढाणा**

अनेक पिढ्यांच्या उद्धारकर्त्या व शिक्षणाची जगन्माता सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने शनिवार, ३ जानेवारी २०२६ रोजी विशेष व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात प्रसिद्ध व्याख्यात्या राजेश्रीताई सचिन गायकवाड यांचे व्याख्यान होणार आहे. हा कार्यक्रम शनिवार, ३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता पत्रकार भवन, बुलढाणा येथे संपन्न होणार आहे. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. अभिलाष माळी (वैद्यकीय सर्जन) तसेच देवांगणाताई अमित ठाकरे (नगरसेविका, नगर परिषद बुलढाणा) उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार सुरेखाताई सोमनाथ



सावळे असतील. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी पत्रकार परिषदेचे प्रदेश प्रतिनिधी गणेश निकम तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवराज वाघ करणार आहेत. सावित्रीमाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव करणाऱ्या या कार्यक्रमास नागरिकांनी, पत्रकार बांधवांनी व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिवसाई यूनिवर्सल ज्युनिअर कॉलेज च्या अद्वैत घुगे ची राज्यस्तरीय आर्चरी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी




**जनसंचलन/बुलढाणा**

राज्यस्तरीय आर्चरी स्पर्धा क्रीडा व युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य , पुणे यांच्या मार्फत आयोजन करण्यात आले होते. १९ वर्षं वयोगटा मध्ये शिवसाई यूनिवर्सल ज्युनिअर कॉलेज कोळवड , बुलडाणा चा अद्वैत घुगे या विद्यार्थ्याने अमरावती विभागाचे प्रतिनिधित्व करत सहभाग नोंदविला. यात उत्कृष्ट कामगिरी करत कांस्य पदक पटकावले. शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या ५% क्रीडा सवलती साठी पात्र ठरला आहे. त्याच्या या कामगिरी साठी शिवसाई यूनिवर्सल चे संचालक श्री डी एस लहाने सर यांनी त्याचे अभिनंदन केले आहे. आपल्या यशाचे श्रेय त्यानी त्याचे प्रशिक्षक श्री चंद्रकांत इलग सर व क्रीडा शिक्षक श्री सागर उबाळे यांना दिले आहे. अद्वैत घुगे याने यापूर्वीही अनेक स्पर्धांतून आपले आर्चरी कौशल्य दाखवून दिले आहे. शिवसाई यूनिवर्सल मधून अभ्यासा सोबत विद्यार्थ्यांचे क्रीडा गुणांना ही वाव दिला जातो . प्राचार्य डॉ. सुनील दाभाडकर व प्रमोद मोहरकर यांनीही अद्वैत घुगे याचे अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# तेलाची निसरडी वाट...



अशक्यप्राय दावे करण्यात किंवा आत्मविश्वासाने कोणत्याही गोष्टीचे सुलभीकरण करण्यात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना कोणीही हरवू शकत नाही. गेल्या वर्षीच्या निवडणुकीच्या प्रचारात त्यांनी सत्तेवर आल्यानंतर रशिया आणि युक्रेनमधील युद्ध २४ तासांत संपवू, असा दावा केला होता. सत्तेवर येऊन दहा महिन्यांहून अधिक काळ लोटला तरी ट्रम्प यांना हे युद्ध थांबवता आलेले नाही. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन हे अमेरिकेच्या अटी-शर्तींवर युद्धविराम करण्यास तयार नाहीत; ते आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. चर्चेतून मार्ग निघत नसल्याने, ट्रम्प यांनी रोझनेफ्ट आणि ल्युकॉइल या प्रमुख रशियन तेल कंपन्यांवर ऑक्टोबरमध्ये निर्बंध लादले. रशियाची अर्थव्यवस्था तेल आणि गॅस निर्यातीवर अवलंबून असल्याने, हे निर्बंध रशियाला कमकुवत करून युद्धविरामासाठी राजी करतील, अशी ट्रम्प यांना आशा आहे. अमेरिकेचे माजी अध्यक्ष जो बायडेन यांच्यापेक्षा आपण वेगळे आहोत हे दाखवण्याचा ट्रम्प नेहमी प्रयत्न करतात. मात्र, यापूर्वी बायडेन यांनी वापरलेले निर्बंधाचे शस्त्रच ट्रम्प आता वापरत आहेत. आजवरचा निर्बंधांचा इतिहास पाहिल्यास, निर्बंधांमुळे अपेक्षित परिणाम होतोच, असे दिसत नाही. इराण, इराक, व्हेनेझुएला, रशिया हे देश खनिज तेलाच्या निर्यातीवर अवलंबून आहेत; परंतु अमेरिका आणि पाश्चात्त्य राष्ट्रांनी निर्बंध लादल्यानंतरही त्यांची निर्यात पूर्णपणे ठप्प झालेली नाही. या देशांनी निर्यातीची पर्यायी व्यवस्था उभी केल्यामुळे निर्बंधांचा अपेक्षित परिणाम साधला गेलेला नाही. अमेरिकेने रशियन तेल कंपन्यांवर घातलेल्या नवीन निर्बंधांमुळे भारतीय तेल कंपन्यांसमोर अचानक मोठी अडचण उभी राहिली आहे. या वर्षातील पहिल्या नऊ महिन्यांत भारताने रशियाकडून दररोज १.९ दशलक्ष बॅरल तेल खरेदी केले, जे रशियाच्या एकूण निर्यातीच्या जवळपास ४० टक्के होते. भारतातील सरकारी तेल शुद्धीकरण कंपन्या रोझनेफ्ट आणि ल्युकॉइल यांच्याकडून थेट तेल खरेदी न करता, मध्यस्थांमार्फत खरेदी करतात. रशियन तेलाचा व्यापार सुकर व्हावा म्हणून दुबई आणि सिंगापूरमध्ये अनेक तृतीय-पक्ष व्यापारी कंपन्या (थर्ड पार्टी ट्रेडर्स) तयार झाल्या आहेत. यापूर्वी अमेरिकेने लादलेले निर्बंध पाळतही कंपन्यांना तेल आयात करणे यामुळे शक्य झाले होते. रशिया तेल निर्यात करताना किमतीत सूट देत असल्याने, सरकारी कंपन्या आणि रिलायन्ससारख्या खासगी कंपन्या मोठ्या आनंदाने तेल विकत घेत होत्या. काही वर्षांपूर्वी प्रति बॅरल २० डॉलरपर्यंत मिळणारी सूट जागतिक बाजारातील तेलाचे दर कमी होताच कमी झाली. मात्र, ही सूट मिळत असल्याने भारतीय तेल कंपन्यांच्या नफ्यात वाढ झाली. युक्रेनमधील युद्धापूर्वी भारताच्या एकूण तेल आयातीत रशियाचा वाटा दोन टक्क्यांपेक्षा कमी होता, तो आता वाढून सुमारे ३५ टक्के झाला आहे. अमेरिकेच्या नवीन निर्बंधांमुळे आता भारतीय आयातदारांना या दोन रशियन कंपन्यांकडून खरेदी थांबवण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. रशियातून भारतात येणारे जवळपास सर्वच तेल याच दोन कंपन्यांकडून येते, त्यामुळे आगामी काळात रशियाकडून होणारी आयात मोठ्या प्रमाणात कमी होईल. रशियाकडून होणारी आयात कमी झाली किंवा बंद झाली तरी भारतात तेलाचा तुटवडा निर्माण होणार नाही, कारण जागतिक बाजारात तेलाचे अतिरिक्त उत्पादन होत आहे. ङ्गओपेकफ संघटना आणि इतर उत्पादक देश रशियाची पोकळी सहज भरून काढतील. मात्र, ट्रम्प यांचा आग्रह आहे की भारताने अमेरिकेकडून तेल आयात वाढवावी. एकेकाळी अमेरिका जगातील सर्वांत मोठा खनिज तेल आयातदार होता. मात्र, गेल्या दोन दशकांत शेल तंत्रज्ञानामुळे अमेरिकेचे तेल आणि गॅसचे उत्पादन वेगाने वाढले आणि पाच वर्षांपूर्वी अमेरिका निर्यातदार बनला. सध्या अमेरिका जगातील सर्वांत मोठा तेल उत्पादक आहे. ट्रम्प यांना निवडणुकीच्या प्रचारासाठी तेल कंपन्यांनी सढळ हाताने मदत केली होती आणि या कंपन्यांचे हित अमेरिकेतून वाढत्या निर्यातीत आणि जागतिक बाजारात तेलाचे दर चढे राहण्यात आहे. अमेरिकेमध्ये खनिज तेलाच्या मागणीतील वाढ मंदावली आहे आणि इलेक्ट्रिक वाहनांमुळे त्यात वाढ होण्याची शक्यताही नाही. अशा परिस्थितीत अमेरिकेला एक हक्काचा ग्राहक हवा आहे. सध्या जगामध्ये खनिज तेलाच्या मागणीत सर्वाधिक वाढ भारतात होत आहे. खनिज तेलाच्या बाबतीत आपण जगातील तिसरी मोठी बाजारपेठ आहोत. त्यामुळे हा ग्राहक मिळवण्यासाठी अमेरिका व्यापार करार आणि निर्बंधांच्या माध्यमातून भारतावर दबाव टाकत आहे. जर आपण अमेरिकेकडून खनिज तेलाची आयात वाढवली, तर साहजिकच अमेरिकेची भारतासोबतची व्यापार तूट कमी होऊन द्विपक्षीय व्यापार करार करणे सोपे होईल.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# महाराष्ट्रात मराठीचीच सक्ती, मराठी भाषा वगळता अन्य कोणत्याही भाषेची सक्ती नाही

## ९९ व्या साहित्य संमेलनात मुख्यमंत्र्यांचं स्पष्टीकरण..




**सातारा :** पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीच्या राज्य सरकारच्या आदेशाचे जोरदार पडसाद ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमात शुक्रवारी उमटले. 'महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदीची नव्हे, तर फक्त मराठीची सक्ती हवी,' अशी एकमुखी मागणी करून साहित्यिकांनी राज्य सरकारच्या त्रिभाषा धोरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत टीकास्त्र सोडले. 'महाराष्ट्रात फक्त आणि फक्त मराठीच सक्तीची असेल,' असे स्पष्टीकरण मुख्यमंत्री फडणवीस यांना त्यावर द्यावे लागले.महाराष्ट्र साहित्य परिषदेची शाहूपुरी शाखा आणि आणि मावळा फाउंडेशनच्या वतीने आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन ख्यातनाम लेखिका, विचारवंत डॉ. मृदुला गर्ग यांच्या हस्ते झाले. ९९ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील, ९८ व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले, साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार, कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी उपस्थित होते. स्नेहल दामले यांनी सूत्रसंचालन केले.मायमराठीची अवहेलना होत असताना मावशीचे कोडकौतुक सहन करू शकत नाही. महाराष्ट्रात मराठी भाषेचीच सक्ती असायला हवी. नव्या शैक्षणिक धोरणाशी विसंगत हिंदी भाषा सक्तीचा निर्णय राज्य सरकारने कायमचा रद्द करावा,' अशी मागणी प्रा. जोशी यांनी केली. 'यापुढील काळात मराठी भाषा आणि साहित्य विकसित करण्यासाठी आताच्या पिढीचा पाया मजबूत करणे आवश्यक आहे. त्यासाठी आपण काही करणार आहोत का, असा सवाल करून भवाळकर यांनी 'लहान वयात मुलांवर अनेक भाषांचे दडपण नको,' अशा कानपिचक्या दिल्या.त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी, 'महाराष्ट्रात केवळ मराठीची सक्ती असेल,' असा खुलासा केला. 'महाराष्ट्रात मराठी भाषा वगळता अन्य कोणत्याही भाषेची सक्ती नाही. कोणत्या वर्गापासून अन्य भाषा शिकवायची याचा विचार करण्यासाठी नेमलेल्या डॉ. नरेंद्र जाधव समितीचा अहवाल अंतिम टप्प्यामध्ये आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर मराठीला आता भारतात लोकमान्यता मिळवून देण्याचे काम आपल्याला करायचे आहे,' असे त्यांनी सांगितले.

## मुंबईचा महापौर हिंदू-मराठी होणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीचे बिगुल वाजले असून, मुंबईचा पुढचा महापौर कोण असणार? या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत स्पष्ट आणि रोखठोक भूमिका मांडली आहे. एका वाहिनीच्या मुलाखतीच्या कार्यक्रमात बोलताना फडणवीस यांनी जाहीर केले की, मुंबईचा आगामी महापौर हा हिंदू मराठीच असेल. त्यांच्या या विधानामुळे महायुतीच्या प्रचाराला आता 'मराठी आणि हिंदुत्वाचा' धारदार पैलू मिळाला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृपाशंकर सिंह यांच्या विधानाचा संदर्भ देत विरोधक आणि प्रसारमाध्यमांच्या प्रश्नांचं फडणवीसांनी उत्तर दिलं आहे.मुंबईच्या महापौराबाबत भाजप नेते कृपाशंकर सिंह यांनी केलेल्या विधानाचा धागा पकडून विचारलेल्या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत आक्रमक आणि स्पष्ट भूमिका मांडली. फडणवीस म्हणाले की, 'एक तर कृपाशंकर सिंह कुठे म्हणाले? ते मीरा-भाईंदरमध्ये म्हणाले, मुंबईत नाही म्हणाले. दुसरं म्हणजे, कृपाशंकर सिंह




हे आमचे अधिकृत प्रवक्ते आहेत का? आता यांच्याकडे (विरोधकांकडे) कोणी काहीही बोलतं... तुम्ही आपलं मीरा-भाईंदरचं काढलं आणि मुंबईत दाखवलं. तुम्ही फार हुशार लोकं आहात.'फडणवीस पुढे ठामपणे म्हणाले, 'म्हणून तुम्हाला आता अधिकृतपणे या पक्षाचा नेता म्हणून सांगतो; मुंबईचा महापौर महायुतीचा होईल, मुंबईचा महापौर हिंदू होईल आणि मुंबईचा महापौर मराठी होईल.' मुख्यमंत्र्यांच्या या विधानामुळे महापौराच्या मुद्द्यावर भाजपच्या भूमिकेबाबत असलेली सर्व संदिग्धता आता संपुष्टात आली असून, त्यांनी मुंबईत 'मराठी आणि हिंदू' अस्मितेवरच महायुतीचा महापौर बसणार असल्याचा पुनरुच्चार केला आहे.

## ठाकरेंच्या युतीला झटका १ जागा गमावली

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीत ठाकरे बंधूंची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. ठाकरे बंधूंच्या राजकीय भवितव्याच्या दृष्टीनं मुंबई महापालिकेची निवडणूक अतिशय महत्त्वाची आहे. मुंबईत ठाकरेंसमोर महायुतीचं कडवं आव्हान आहे. शहरातील एक-एक जागा महत्त्वाची असताना ठाकरे बंधूंना निवडणुकीत मोठा धक्का बसला आहे. मुंबईत ठाकरे बंधूंच्या युतीसोबत शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आहे. पवारांचा पक्ष १० जागा लढवत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारांच्या पक्षाला मुंबईत दुसरा धक्का बसला आहे. प्रभाग क्रमांक २११ मधील उमेदवार सुफियान अन्सारी यांनी त्यांचा अर्ज परस्पर माघारी घेतला आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना कोणतीही कल्पना न देता अन्सारी यांनी माघार घेतली आहे. त्यामुळे पक्षात नाराजी आहे. अन्सारी यांनी अर्ज मागे घेतल्यानं आता प्रभाग क्रमांक २११ मध्ये काँग्रेस विरुद्ध समाजवादी पक्ष अशी लढत होईल. पवारांच्या उमेदवारानं माघार घेतल्यानं ठाकरेंच्या युतीला धक्का बसला आहे. ठाकरे बंधूंनी मतदानाच्या आधीच एक जागा गमावली आहे.

## शिंदेंच्या होमपीचवर भाजप सुस्साट; देवाभाऊंच्या शिलेदारानं करुन दाखवल

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात येणाऱ्या कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीत भाजप-शिंदेसेना यांच्या महायुतीनं आतापर्यंत २० जागा बिनविरोध जिंकल्या आहेत. कल्याण-डोंबिवली महापालिकेतील एकूण नगरसेवकांचा आकडा १२२ आहे. त्यामुळे बहुमतासाठी ६२ जागा गरजेच्या आहेत. महायुतीनं मतदानाला १३ दिवस शिल्लक असताना २० जागा खिशात घातल्या आहेत. त्यामुळे आता महायुती विजयापासून ४२ जागा दूर आहे.कल्याण-डोंबिवलीत शिंदेसेना ६६, तर भाजप ५६ जागा लढवत आहे. गेल्या निवडणुकीच्या कामगिरीवर जागावाटप झालेलं आहे. या ठिकाणी विरोधकांची ताकद अगदीच क्षीण झालेली आहे. त्यामुळे भाजपचे स्थानिक नेते आणि कार्यकर्ते स्वबळावर लढण्यासाठी आग्रही होते. पण युतीचा निर्णय झाला. भाजपच्या वाट्याला कमी जागा आल्या.भाजप लढवत असलेल्या ५६ जागांपैकी १४ जागांवर पक्षानं विजय मिळवला आहे. त्यांचे उमेदवार बिनविरोध जिंकून आले आहेत. आतापर्यंत भाजपच्या रंजना पेणकर,



आसावरी नवरे, मंदा पाटील, ज्योती पाटील, रेखा चौधरी, मुकुंद पेडणेकर, महेश पाटील, साई शेलार, दिपेश म्हात्रे, जयेश म्हात्रे, हर्षदा भोईर, डॉ. सुनीता पाटील, पूजा म्हात्रे, रवीना माळी असे १४ जण विजयी झाले आहेत. याचा अर्थ भाजपनं २५ टक्के जागा बिनविरोध जिंकलेल्या आहेत. साई शेलार सलग दुसऱ्यांदा बिनविरोध विजयी झाले आहेत. दुसरीकडे ६६ जागा लढवत असलेल्या शिंदेसेनेचे ६ जण बिनविरोध निवडून आले आहेत. शिंदेसेनेच्या रेश्मा निचळ, ज्योती मराठे, रमेश म्हात्रे, विश्वनाथ राणे, वृषाली जोशी आणि हर्षल मोरे असे ६ नगरसेवक बिनविरोध निवडून आलेले आहेत. बिनविरोध विजयी होण्यात शिंदेसेनेचा स्ट्राईक रेट भाजपच्या तुलनेत कमी आहे.

## भाजपचे निष्ठावंत वाऱ्यावर, आमदारांच्या पुत्राची थेट बिनविरोध निवड

**जळगाव :** जळगाव महानगरपालिकेमध्ये भाजपने आज दुसरे खाते उघडले असून भाजपचे जळगाव शहराचे आमदार सुरेश भोळे यांचे पुत्र विशाल भोळे यांची प्रभाग क्रमांक सात मधून बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्याविरोधात असलेल्या आठ जणांनी अर्ज माघारी घेतल्याने आज बिनविरोध निश्चित झाली. एकीकडे भाजपने आदेश दिले असताना आमदार -खासदारांच्या घरातील नातेवाईक अथवा पुत्र कुणालाही उमेदवारी देण्यात येऊ नये, असे आदेश असले तरी, मात्र भाजप आमदार सुरेश भोळे यांनी या आदेशाला केराची टोपली दाखवत आधी पत्नी सिमा भोळे यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यानंतर त्यांना एबी फॉर्म न दिल्याने त्यांचे पुत्र विशाल भोळे यांना एबी फॉर्म दिला आणि आज विशाल भोळे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे.नाशिक येथील आमदार देवयानी फरांदे यांच्या घरातील उमेदवारांनी अर्ज दाखल केला होता, मात्र पक्षाचा आदेश असल्याने त्यांनी त्यांच्या घरातील उमेदवारांचा उमेदवारी अर्ज दाखल न करण्याचा निर्णय घेतला. एकंदरीत त्यांनी पक्षांच्या आदेशाचे, सूचनेचे पालन तंतोतंत केले. तरी मात्र जळगाव शहरातील भाजपचे आमदार



सुरेश भोळे यांनी या आदेशाची पायमल्ली केली असल्याने सुरेश भोळे यांना भाजपाचा आदेश मान्य नसावा, अशीच चर्चा सध्या सुरू आहे

दुसरीकडे भारतीय जनता पार्टीने अनेकठिकाणी निष्ठावान कार्यकर्त्यांना डावलले असून त्यांचा आक्रोश पाहायला मिळाला आहे. तिकिटासाठी कार्यकर्ते वणवण भटकंती करत होते. पक्ष आपल्यालाच उमेदवारी देईल, या आशेने उमेदवार पक्षाकडे डोळे लावून होते, मात्र निष्ठावान कार्यकर्त्यांना डावलून पण आमदारांच्या पुत्राला उमेदवार करुन बिनविरोध केल्याने निष्ठावान कार्यकर्त्यांनी तीव्र नाराजी दर्शवली आहे.प्रभाग क्रमांक १२ मधून भाजप उमेदवार उज्वला बेंडाळे या सर्वात आधी बिनविरोध निवडून आल्या. त्यानंतर आज विशाल भोळे यांची बिनविरोध निवड झाल्याने भाजपाच्या दोन आणि शिवसेना शिंदे यांच्या चार जागा या बिनविरोध निवडून आल्या असल्याने एकूणच महायुतीच्या सहा जागा महानगरपालिकेत पक्क्या झाल्या आहेत.

आमदार सुरेश भोळे यांचे पुत्र बिनविरोध झाल्यानंतर विशाल भोळे यांनी सांगितले की, प्रभाग क्रमांक सात हा आमचा आधीपासूनचा गड आहे. त्या ठिकाणी वीस वर्षापासून माझी आई सीमा घोडे या ठिकाणी प्रतिनिधित्व करीत आहे, मात्र यावेळेस त्यांना पक्षाने संधी न दिल्याने पक्षाने मला त्या ठिकाणी संधी दिली आहे, त्यामुळे ही कुठलाही घराणेशाही नसून गेल्या २० वर्षापासून आम्ही आमच्या स्वतःच्या प्रभागामध्ये प्रतिनिधित्व करीत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# तीन लग्न, सात पोरं; चौथ्यांदा बोहल्यावर चढण्याची इच्छा, गर्भवती पत्नीने विरोध करताच भयंकर घडलं

**पाटणा :** एका २२ वर्षीय तरुणाने त्याच्या तिसऱ्या पत्नीची हत्या केली कारण ती त्याच्या चौथ्या लग्नात अडथळा आणत होती. या घटनेपासून आरोपी पती फरार आहे. त्याला अटक करण्यासाठी पोलिस शक्य त्या ठिकाणी छापे टाकत आहेत. बिहारमधील पूर्णिया येथे हे धक्कादायक हत्याकांड उघडकीस आले आहे. म हिलेच्या निर्घृण हत्येमुळे संपूर्ण गावात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पूर्णिया जिल्ह्यातील अकबरपूर पोलिस स्टेशन हद्दीतील जमरा गावात ही घटना घडल्याची माहिती आहे. गावातील रहिवासी सिंटू ऋषिदेव पंजाबमध्ये मजूर म्हणून काम करतो. त्याच्या गावाजवळील ओराहा येथील रहिवासी कैलाश ऋषिदेव देखील रोजगाराच्या शोधात त्याच्या संपूर्ण कुटुंबासह पंजाबला गेला होता. तिथे सिंटू ऋषिदेव कैलाशची मुलगी मंजू कुमारी हिच्या प्रेमात पडला. सिंटूची कमाई पाहता कैलाशने त्याचं लग्न मंजूशी लावून दिले. संपूर्ण कुटुंब फक्त आठ दिवसांपूर्वीच पंजाबहून पूर्णियाला आले होते.मृत महिलेची आई रत्नाणी देवी यांनी सांगितले की, पंजाबहून परतल्यापासून तिचा जावई त्यांच्यासोबतच राहत होता. तीन दिवसांपूर्वी सिंटूची आई धौली देवी त्यांच्या घरी आली आणि महिलेला सोबत घेऊन गेली. मृत महिलेच्या आईने सांगितलं की, तिच्या मुलीशी लग्न केल्यानंतर जावई त्यांच्याच घरी राहू लागला होता. फोनवरील संभाषणादरम्यान




तिच्या मुलीला पतीच्या विवाहबाह्य संबंधांबाबत कळालं. तिला कळालं की तिच्या पतीचे अनेक प्रेमसंबंध होते.सिंटूचे आधीच दोन लग्न झाले होते. त्याला त्याच्या पहिल्या पत्नीपासून चार आणि दुसऱ्या पत्नीपासून तीन मुलं होती. त्याची तिसरी पत्नी चार महिन्यांची गर्भवती होती. जेव्हा तो तिला सासरी घेऊन गेला तेव्हा त्याच्या दोन बायकांनी खूप गोंधळ घातला होता. इतकंच नाही तर, तिसरी पत्नी गरोदर असताना सिंटूचे आणखी एका महिलेशी प्रेमसंबंध होते. त्याच्या या प्रेमसंबंधांना तिसरी पत्नी विरोध करत होती. सिंटूकडे अनेक महिलांचे फोन नंबर होते, ज्यांच्याशी तो वारंवार संपर्क साधत होता.मृत महिलेने मंगळवारी फोन करून सांगितले की, ती तिच्या पतीसोबत बहादुरा बाजारात आली आहे. तेव्हापासून तिच्याशी संपर्क होत नव्हता. कुटुंब तिच्या सासरच्या घरी गेले तेव्हा सर्वजण फरार झालेले होते. फोन करूनही कोणाशीही संपर्क होत नव्हता.

## मैत्रिणीची धमकी अन लग्नाच्या १४ दिवसांपूर्वी तरुणी गर्लफ्रेंडसोबत पळाली

**चंदीगड :** समलैंगिक विवाहाला कायदेशीर मान्यता मिळाली असली तरी, समाजात त्याबाबत अद्यापही स्विकृती नाही. आजही समाज समलैंगिक नात्यांना मान्य करत नाही, त्यामुळे त्यातून अशा काही घटना घडतात ज्या सर्वांना विचार करायला लावणाऱ्या असतात. आता पंजाबमधील तरनतारन येथे असाच एक प्रकार सध्या चर्चेत आहे. येथे, एक तरुणी तिच्या लग्नाच्या फक्त १४ दिवसांपूर्वी आपल्या प्रेयसीसोबत पळून गेली.याप्रकरणी मि ळालेल्या माहितीनुसार, मुरादपुरा परिसरात राहणाऱ्या एका कामगार कुटुंबातील मुलगी लखविंदर कौरचे लग्न १४ जानेवारीला होणार होते. तिचे खदूर साहिब येथील एका तरुणाशी लग्न ठरले होते. कुटुंबाने लग्नाची तयारी पूर्ण केली होती. कन्यादानपासून हुंड्यापर्यंत सर्व काही कर्ज काढून जम वण्यात आलं होतं. लग्नाच्या पत्रिका देखील छापण्यात आल्या होत्या. घरात उत्साह आणि आनंदाचे वातावरण होते. दरम्यान, लखविंदर कौरची मैत्रीण सुनीताने एक घोषणा केली ज्यामुळे संपूर्ण कुटुंब हादरून गेले. स्वतःला रता म्हणवणारी आणि पुरूषांसारखे कपडे घातलेली सुनीता स्पष्टपणे म्हणाली की, ती लखविंदरचं लग्न होऊ देणार नाही. तिने दावा केला की, ती आणि लखविंदर एकमेकांवर प्रेम करतात आणि समलैंगिक विवाह करु इच्छितात.,सुरुवातीला, लखविंदरची आई मनजीत कौर यांनी ही केवळ मैत्री समजून याकडे दुर्लक्ष केलं. पण, २४ डिसेंबरच्या सकाळी सर्व काही बदलले. सकाळी १० वाजण्याच्या सुमारास सुनीता लखविंदर कौरला सोबत घेऊन गेली आणि दोघेही अचानक घरातून गायब झाले.कुटुंबाने नातेवाईक आणि ओळखीच्या लोकांकडे शोध घेतला, पण त्यांचा कोणताही पत्ता लागला नाही. त्यांच्या मुलीच्या बेपत्ता होण्याने पालकांची चिंता वाढली आणि त्यांना सामाजिक बदनामीची भीतीही वाटत होती. त्यांतर मनजीत कौर यांनी पोलिस तक्रार दाखल केली, ज्यामध्ये सुनीता यांनी तिच्या नातेवाईकांशी संगनमत करून लखविंदरला पळवून नेल्याचा आरोप करण्यात आला.

## सिझरनंतर दीडवर्ष असह्य पोटदुखी, MRI पाहून डॉक्टरांना धक्का, पोटात 'ती' वस्तू अन महिलेचा मृत्यू


**पाटणा :** डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे एका महिलेला आपला जीव गमवावा लागला आहे. या महिलेच्या पोटात शस्त्रक्रियेदरम्यान राहिलेल्या कात्रीमुळे तिचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. या घटनेनंतर पीडितेचं कुटुंब शोकसागरात बुडालं आहे. बिहारच्या पूर्व चंपारण जिल्ह्यातून ही धक्कादायक घटना समोर आली आहे.या प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, पूर्व चंपारण जिल्ह्यातील जितना पोलीस स्टेशन परिसरातील रहिवासी मणिभूषण कुमार यांच्या २५ वर्षीय पत्नी उषा देवी यांचे दीड वर्षांपूर्वी गरोदरपणात सिझेरियन झाले होते. ऑपरेशननंतर महिलेने एका मुलीला जन्म दिला. डॉक्टरांनीच या महिलेचं सिझेरियन करण्याचा सल्ला दिला होता. त्यानंतर कुटुंबाने सहमती दर्शवली आणि तिचं ऑपरेशन करण्यात आलं.ऑपरेशननंतर महिलेला सतत पोटदुखीचा त्रास होत होता. कुटुंबाने अनेकवेळा अल्ट्रासाऊंड केले, परंतु काहीही गंभीर आढळून आले नाही. डॉक्टर नेहमी तिला वेदना कमी करण्यासाठी औषधे लिहून द्यायचे. पण, त्याने फक्त तात्पुरता आराम मिळत असे दिला. तिच्या वेदना कधीही पूर्णपणे कमी झाली नाही.काही दिवसांपूर्वी तिला अचानक असह्य पोटदुखी होत होती. तेव्हा मृत महिलेच्या कुटुंबाने तिला डॉक्टरकडे नेले. एमआरआय स्कॅन करण्यात आले. जेव्हा त्याचा अहवाल समोर आला, त्याने सर्वांना धक्का बसला. महिलेच्या पोटात चक्क कात्री असल्याचं आढळून आलं. अहवाल पाहिल्यानंतर डॉक्टरांनी तात्काळ शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. त्यांनी कुटुंबाला असंही सांगितले की विलंब



झाल्यास रुग्णाचा मृत्यू होऊ शकतो.डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार, उषा देवीच्या कुटुंबाने तिला रहमानिया रुग्णालयात नेले, जिथे तिच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. कुटुंबाने सांगितलं की, ऑपरेशन दरम्यान महिलेच्या पोटातून कात्री काढण्यात आली होती, परंतु त्यानंतर काही वेळातच तिचा मृत्यू झाला.महिलेच्या मृत्यूनंतर कुटुंबाने एकच आक्रोश केला. कुटुंबाने आरोप केला आहे की, डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळेच उषा देवी यांचा मृत्यू झाला आहे. या संपूर्ण घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली आहे. पोलिस या प्रकरणाची चौकशी करत असून पोस्टमॉर्टम अहवालाच्या आधारे पुढील कारवाई करण्यात येईल, असं पोलिसांनी सांगितलं. मात्र, या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली आहे.

# १० वर्षांच्या प्रार्थनेनंतर मुलाचा जन्म, सहा महिन्यांत आनंद हिरावला, बाळाचा तडफडून अंत, आईने दुधात..

**इंदूर :** दूषित पाण्यामुळे एका सहा म हिन्यांच्या बाळाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. मध्य प्रदेशातील इंदूर शहरातील भगीरथपुरा हा मराठी बहुल परिसरात हा प्रकार घडला. या घटनेमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून त्यांनी पालिका प्रशासनावर निष्काळजीपणा केल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणी मध्य प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. दहा वर्षांच्या प्रार्थनेनंतर जन्माला आलेलं बाळ दगावल्याने आईने आक्रोश केलाबाळाची आई साधना साहू यांनी सांगितले की, घरगुती नळाच्या पाण्यासोबत मिसळलेले दूध प्यायल्यानंतर बाळाला जोरदार उलट्या आणि जुलाब सुरु झाले. सुरुवातीला त्याला सरकारी



रुग्णालयात नेण्यात आले आणि नंतर खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र तिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.माझे बाळ गेले... आणखी किती निष्पाप जीव गमावले जातील, कोण जाणे,' असे त्या म्हणाल्या. त्यांनी सांगितले की, अनेक वेळा तक्रारी करूनही परिसरात 'कालव्यासारखे घाणेरडे पाणी' पुरवले जात होते. साहू यांनी असेही सांगितले की, त्यांची १० वर्षांची मुलगी देखील आता पोटदुखीची तक्रार करत आहे, जी त्यांना दूषित पाण्याशी संबंधित असल्याचे वाटते.दूषित पाण्याचा मोठा त्रास सहन करणाऱ्या भगीरथपुरा पट्ट्यात ही घटना घडली आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, शहरांतील २७ रुग्णालयांम ध्ये सध्या १४९ रुग्ण उपचार घेत आहेत, तर संशयित जलजन्य आजारांमुळे किमान आठ मृत्यूंची नोंद झाली आहे. बाधितांम ध्ये लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांचा समावेश आहेस्थानिक रहिवाशांचा दावा आहे की, इंदूर महानगरपालिकेने अनेक दिवसांपासून केलेल्या तक्रारींकडे दुर्लक्ष केले गेले. परिस्थितीची दखल घेत मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. चौकशी प्रलंबित असेपर्यंत महानगरपालिकेने विभागीय अधिकारी आणि एक सहायक अभियंता यांना निलंबित केले आहे. राज्य सरकारने मृतांच्या कुटुंबीयांना २ लाखांची मदत जाहीर केली आहे.

दरम्यान, आरोग्य विभागाने बाधित भागांमध्ये क्लोरीनेशनची प्रक्रिया वाढवली आहे आणि पिण्याच्या पाण्यासाठी टँकर तैनात करण्यात आले आहेत. साधना साहू यांनी सांगितले की 'मी आणि माझं कुटुंब गेली १० वर्षे मुलाच्या जन्माची वाट पाहत होतो. नवस-सायास केले, डॉक्टरांचे उपचार आणि अथक प्रयत्नांनी आमच्या घरी पुत्ररत्न आले, पण अवघ्या सहा महिन्यात आमचा आनंद हिरावला.' असं म्हणत साधना यांनी आक्रोश केला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रोहित आणि विराटला अजून एक मोठा धक्का, नवीन वर्षात नेमकं करणार तरी काय..




**नवी दिल्ली :** रोहित शर्मा आणि विराट कोहली या दोघांनाही बीसीसीआयने गेल्या वर्षी धक्के दिले आहेत. पण आता नवीन वर्षात बीसीसीआय त्यांना अजून एक मोठा धक्का देण्याच्या तयारीत आहे. रोहित शर्माकडून बीसीसीआयने गेल्यावर्षी कसोटी संघाचे कर्णधारपद काढून घेतले, त्यानंतर त्याला कसोटी संघाबाहेर केले. रोहितच्या नेतृत्वाखाली भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती. पण तरीही रोहित शर्माला वनडे कॅप्टन्सीवरून काढून टाकले. विराट कोहलीलाही बीसीसीआयने कसोटी संघामधून बाहेरचा रस्ता दाखवला या दोघांना फक्त वनडे क्रिकेट खेळायला सांगितले आणि तिथेही त्यांच्या डोक्यावर त्यांनी टांगती तलवार ठेवली. आता नवीन वर्षात रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना बीसीसीआय अजून एक मोठा धक्का देण्याच्या तयारीत आहे. ऑस्ट्रेलियातील मालिका गमावल्यावर बीसीसीआयने देशांतर्गत सामन्याची कठोर सक्ती केली. त्याचे पालनही विराट आणि रोहितने केले. मात्र, इंग्लंडविरुद्धची मालिका काही दिवसांवर असताना त्यांनी कसोटीचा निरोप घेतला होता.भारतीय क्रिकेट बोर्डाच्या (बीसीसीआय) वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी नव्या मोसमासाठीचे करारबद्ध खेळाडू निश्चित करण्याच्या दृष्टीने विचार सुरू केला आहे. त्यात अर्थातच कोणाला बढती आणि कोणाची पीछेहाट याचाही विचार होत आहे. केवळ मर्यादित षटकांच्याच लढती खेळत असलेल्या विराट कोहली आणि रोहित शर्माला कराराद्वारे देण्यात येणारी रक्कम कमी होण्याची शक्यता आहे. विराट आणि रोहितचा 'अ' प्लस गटात सध्या समावेश आहे. त्यात कसोटी, टी-२० आणि वन-डे प्रकारासाठी उपलब्ध असलेल्य खेळाडूंनाच स्थान दिले जाते. त्यांना वर्षाला सा कोटी देण्यात येतात. ही गटवारी २०१८पासून सुर झाली. विराट त्यात सुरुवातीपासून आहे. मात्र आता सर्व प्रकारात खेळत नसल्यामुळे त्यांना 'अ गटात स्थान देण्याचा विचार होत आहे. आत विराट तसेच रोहित खालच्या गटात येण्याच शक्यता आहे. रोहित आणि विराट यांना हा ए मोठा धक्काच असेल. त्यामुळे त्यांना कमी रक्क चा करार देण्याचा निर्णय बीसीसीआयने घेतल असल्याचे समजते. अर्थात याबाबत सखोल मंथ सुरू आहे.नव्या कराराची घोषणा काही दिवसां अपेक्षित आहे. त्या कराराबरोबरच देशांतर्गत स्प त खेळणाऱ्या खेळाडूंच्या मानधनात वाढ करण्याच निर्णयही अपेक्षित आहे.

## ८ षटकार अन १५ चौकार! ध्रुवचं शतक

**मुंबई :** भारतीय यष्टीरक्षक-फलंदाज ध्रुव जुरेलने आपल्या लिस्ट ए करिअरमधील पहिलं शतक झळकावलंय. सोमवारी राजकोट येथे झालेल्या विजय हजारे ट्रॉफीमध्ये बडोद्याविरुद्ध खेळताना ध्रुव जुरेलने उत्तर प्रदेशकडून फलंदाजी करताना अवघ्या ७८ चेंडूत शतक झळकावले. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी मैदानात उतरलेल्या उत्तर प्रदेशच्या ध्रुव जुरेलनं बडोदा संघाच्या गोलंदाजांची जबरदस्त धुलाई केली.

त्याने १०१ चेंडूमध्ये नाबाद राहत १६० धावांची जबरदस्त खेळी केली. ध्रुव जुरेलच्या या खेळीमुळे उत्तर प्रदेशच्या संघाची धावसंख्या ३६९ वर पोहचली. ध्रुव जुरेलने त्याच्या खेळीत १५ चौकार आणि ८ षटकारांचा समावेश आहे. या तुफान फटकेबाजीत त्याने वेगवान गोलंदाज रसिक सलामच्या षटकात ५५ धावा ठोकून काढल्या.

ध्रुव जुरेलने विजय हजारे ट्रॉफी २०२५-२६ च्या मोहिमेची सुरुवात चांगली केली. त्याने पहिल्या दोन फ ऱ्यांमध्ये हैदराबाद आणि चंदीगडविरुद्ध अर्धशतके झळकावली. आता तिसऱ्या सामन्यात त्याने १६० धावांची शानदार खेळी केली आहे. दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय




मालिकेसाठी जुरेलचा भारतीय संघात समावेश करण्यात आला होता, परंतु त्याला कोणत्याही सामन्यात खेळण्याची संधी मिळाली नव्हती.

तिसऱ्या क्रमांकावर ध्रुव जुरेलच्या नाबाद १६० धावांव्यतिरिक्त रिंकू सिंहने कर्णधाराप्रमाणे शानदार खेळी केली. डावखुरा फलंदाज रिंकूनं ६७ चेंडूत ६३ धावा केल्या. तर आयपीएलच्या मिनी-लिलावात १२.२ दशलक्ष रुपयांना विकल्या गेलेल्या प्रशांत वीरने २३ चेंडूत ३५ धावा केल्या. रसिख सलाम बडोद्यासाठी सर्वात महागडा गोलंदाज ठरला. त्याने १० षटकांत १०.२ च्या इकॉनॉमी रेटने १०२ धावा दिल्या. राज लिंबानीनेही ७४ धावा दिल्या पण चार विकेट घेतल्या.

## गौतम गंभीर ऋषभ पंतला का ठेवणार संघाबाहेर, मोठं कारण आहे तरी काय?

**नवी दिल्ली :** ऋषभ पंत हा एकेकाळी भारताच्या संघात कायम स्थान मिळवणारा खेळाडू होता. पण आता मात्र न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे सामन्यांसाठी त्याला भारताच्या संघात स्थान मिळणार नाही, असे समोर येत आहे. पण पंतला भारताच्या संघाबाहेर का ठेवण्यात येणार आहे, याचं मोठं कारणही आता समोर आलं आहे.न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी भारतीय संघाची निवड ३ जानेवारीला होणार आहे. या मालिकेस ११ जानेवारीस बडोदा येथील लढतीने सुरुवात होणार आहे. पंत फलंदाजी करताना कायम कमालीचा आक्रमक असतो, हे संघव्यवस्थापनास पूर्ण मान्य नाही. त्याचा कमालीचा धोका पत्करून मोठ्या प्रमाणावर धावा करण्याच्या पद्धतीस काहींचा आक्षेप आहे. कसोटी तसेच वनडे सामन्यांत डावाची उभारणी आवश्यक असते, याकडे लक्ष वेधले जात आहे. विजय हजारे करंडक वनडे क्रिकेट स्पर्धेत ऋषभ पंत फलंदाजीत सातत्याने अपयशी ठरत आहे. त्याने चार सामन्यांत एकच अर्धशतक केले आहे. त्यामुळे




गौतम गंभीर त्याला न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे क्रिकेट मालिकेसाठी भारतीय संघाबाहेरच ठेवण्याची शक्यता आहे. पंत गेल्या १८ महिन्यांत एकही आंतरराष्ट्रीय वनडे खेळलेला नाही.पंतची यापूर्वी वनडे मालिकांसाठी निवड झाली. मात्र तो कायम राखीव यष्टीरक्षकच होता. हेच चॅम्पियन्स करंडक वनडे स्पर्धा तसेच दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेच्यावेळी घडले होते. त्यातच निव्वळ सलामीवीर समजल्या जात असलेल्या ऋतुराज गायकवाडला मधल्या फळीत खेळवण्याचा प्रयोग यशस्वी झाला आणि पंतच्या निव्वळ फलंदाज म्हणू खेळण्याच्या आशाही धूसर झाल्या सात वर्षापूर्वी म्हणजे २०१८मध्ये प्रथ पंतची वनडे संघात निवड झाली. मा तो केवळ ३१ सामनेच खेळला आहे. त ३० जून २०१९ ते १४ जानेवारी २०२ या कालावधीत ११ वनडे खेळला करोनानंतर म्हणजेच २६ मार्च २०२१ ३० नोव्हेंबर २०२२ या कालावधीत त १५ वनडे खेळला होता. त्यात त्याने ए शतक तसेच तीनदा ७५पेक्षा जास्त धाव केल्या होत्या. त्याच सुमारास अपघा झाल्यामुळे तो संघाबाहेर गेला.

# टीमला २०२६ मध्ये तीन गोष्टींवर करावं लागणार काम

**मुंबई :** भारतीय क्रिकेटसाठी २०२६ वर्ष अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. या वर्षात भारतीय संघाला टी२० विश्वचषक खेळायचा आहे, तसेच काही कसोटी सामनेही खेळायचे आहेत. मात्र, या वर्षातील बहुतांश वेळ भारतीय संघ पांढऱ्या चेंडूच्या सामन्यांमध्ये व्यस्त राहणार आहे. त्यामुळे भारतीय संघासमोर अनेक आव्हाने आहेत. यापैकी तीन प्रमुख आव्हान ज्यावर तोडगा काढावाच लागणार आहे. टीम इंडियाचे टी२० कर्णधार सूर्यकुमार यादव यांच्यासाठी २०२५ चा शेवट आकडेवारीनुसार खूपच खराब ठरला. २०२६ च्या टी२० विश्वचषकापूर्वी सूर्याचा फॉर्म संघासाठी एक मोठं कोडं बनलं आहे. मागील १६-१७ डावांमध्ये त्यांची सरासरी




१५ च्या आसपास राहिला आहे आणि त्याच्या बॅटमधून कोणतीही मोठी खेळी आली नाही. कर्णधार म्हणून त्याच्यावर केवळ धावा करण्याचा दबाव नाही, तर आपल्या जागेबद्दल उठणाऱ्या प्रश्नांना उत्तर देण्याचेही आव्हान आहे.भारताचा घरच्या मैदानावर कसोटीतील रेकॉर्ड नेहमीच उत्कृष्ट राहिला आहे, परंतु अलीकडे न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिकेसारख्या संघांनी आपल्याला बॅकफूटवर ठेवलं होतं. २०२६ मध्ये भारताला आपल्या भूमीवर अनेक महत्त्वाचे कसोटी सामने खेळायचे आहेत. फिरकीला अनुकूल पिचेसवर फलंदाजांचा संघर्ष आणि वरिष्ठ खेळाडूंच्या अनुपस्थितीत युवा खेळाडूंची सातत्यपूर्ण कामगिरी ही भारताची सर्वात मोठी परीक्षा असेल.एकीकडे गंभीरच्या प्रशिक्षणात भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ आणि आशिया कप जिंकून व्हाईट-बॉल क्रिकेटमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले, तर दुसरीकडे कसोटी फॉरमॅटमध्ये संघाला काही लाजिरवाण्या पराभवांना सामोरे जावे लागले आहे. गंभीरच्या 'आक्रमक रणनीतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत जी मर्यादित षटकांमध्ये यशस्वी ठर असली तरी रेड-बॉल क्रिकेटमध्ये संघा संतुलन बिघडवत आहे. २०२६ हे गंभी यांच्यासाठी हे सिद्ध करण्याचे वर्ष असे की तो सर्व फॉरमॅटमध्ये समान प्रभाव प्रशिक्षक आहे.भारतीय क्रिकेट संघासाट २०२६ हे वर्ष आव्हानात्मक असणा आहे. टी२० विश्वचषक आणि कसोटी सा न्यांमध्ये संघाला चांगली कामगिरी करावं लागणार आहे. कर्णधार सूर्यकुमार यादवच फॉर्म, घरच्या मैदानावर कसोटीतील वर्चस टिकवणे आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभी याची कसोटीतील रणनीती या तीन प्रमुख बाबींवर संघाचे यश अवलंबून असेल.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# दीपिकाला बाहेरचा रस्ता, स्पिरिट मध्ये झाली तृप्ती डिमरीची एन्ट्री





**मुंबई :** कामांच्या तासांवरून अभिनेत्री दीपिका पादुकोण आणि दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा यांच्यात झालेल्या मतभेदांमुळे 'स्पिरिट' या सिनेमाची बरीच चर्चा झाली. संदीपनं सोशल मीडियावर त्याविषयी जाहीरपणे पोस्ट लिहिल्यावर तर हा वाद आणखी चिघळला. दीपिकानं सिनेमा सोडल्याचंही समजलं. बॉलिवूडमधून वेगवेगळी मतं समोर आली. अनुभवी, ज्येष्ठ मंडळीही त्यावर व्यक्त होऊ लागली. काही दिवसांनी दीपिकाची जागा तृप्ती डिमरीनं घेतल्याचं जाहीर झालं. तेव्हापासून या सिनेमाविषयीचं कुतूहल वाढलं होतं. चाहत्यांना अखेर त्याची पहिली झलक बघायला मिळाली आहे. नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी या सिनेमाचं पहिलं पोस्टरप्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. प्रभास आणि तृप्ती डिमरी असलेल्या या पोस्टरची चर्चा आहे. हे दोघंही पूर्णपणे पोस्टरमध्ये दिसत नसले, तरी सिनेमाचा विषय गंभीर असल्याचं बोललं जातंय. लांब केस आणि फिटनेस यामुळे प्रभासच्या लूकचीही चर्चा आहे. 'ॲनिमल' या सुपरहिट ठरलेल्या सिनेमानंतर संदीप पुन्हा एकदा वेगळाच विषय घेऊन येण्यास सज्ज झाला आहे. या सिनेमात प्रभास आणि तृप्तीसह विवेक ओबेरॉय, प्रकाश राज आणि ज्येष्ठ अभिनेत्री कंचना हे कलाकारही आहेत. सिनेमाची प्रदर्शनाची तारीख अद्याप ठरली नसली, तरी याच वर्षी हा सिनेमा येणार असल्याचं बोललं जातंय. तर दीपिका पदुकोण या चित्रपटात मुख्य भूमिका साकारणार होती. मात्र, काही व्यावसायिक अटींमुळं तिनं या सिनेमातून माघार घेतली, याबाबत आजही तर्कवितर्क ल ढ व ल` जात आहेत. दीपिकानं कामाचे तास (शिफ्ट) मर्यादित ठेवण्याची आणि मानधनात मोठी वाढ करण्याची मागणी केली होती, जी वांगा यांना अमान्य होती. इतकंच नाही तर संदीप रेड्डी वांगा यांनी नाव न घेता सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे, ज्यामध्ये त्यांनी दीपिकाच्या पीआर (झठ) टीमवर निशाणा साधला होता. वांगा यांनी चित्रपटाची स्क्रिप्ट लीक केल्याचा आरोपही संबंधित अभिनेत्रीवर केला आहे. या वादावर दीपिकानं अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही.

# नोलनच्या 'द ओडिसी'चा ट्रेलर सादर



**मुंबई :** द ओपेनहायमर' चित्रपटानंतर क्रिस्टोफर नोलन आणखी एक धमाकेदार चित्रपट घेऊन येत आहे. या चित्रपटाचे नाव 'द ओडिसी' असून यासंबंधी मोठी उत्सुकता दिसून येत आहे. या चित्रपटाचा ट्रेलर जारी करण्यात आला असून यात अभिनेता मॅट डॅमनला इथाकाचा राजा ओडिसियसच्या रुपात दाखविण्यात आले आहे, जो ट्रोजन युद्धानंतर स्वत:च्या सैनिकांना घरी नेत आहे.

ट्रेलमध्ये सागरी दृश्य अधिक पहायला मिळतात, जी अत्यंत सुंदरपणे चित्रित करण्यात आली आहेत. युद्धानंतर परतणारे सैनिक असो किंवा युद्धादरम्यानची स्थिती, नौकेवर स्वार सैनिकांच्या तुकड्यांचे दृश्य अंगावर काटा आणणारे आहे. एक सैनिक युद्धावर जाताना कोणत्या भावनात्मक स्थितींना सामोरा जातो याची झलक ट्रेलरमध्ये दिसून येते. या चित्रपटात मॅड डॅमनने ओडिसियसची भूमिका साकारली आहे. तर टॉम हॉलंडला ओडिसियसचा पुत्र टेलीमाचसच्या रुपात दाखविण्यात आले आहे. ऐनी हॅथवे ही ओडिसियसची पत्नी पेनेलोपच्या भूमिकेत आहे. चित्रपटात रॉबर्ट पॅटिन्सन, जेंडाया, लुपिया न्येंगो, चार्लीज थेरॉन, मिया गोथ, बेनी सफ्डी यासारखे कलाकारही आहेत. नोलनचा हा चित्रपट नवे आयमॅक्स तंत्रज्ञानाचा वापर करत चित्रित करण्यात आला आहे. हा चित्रपट १७ जुलै रोजी प्रदर्शित झाला असून याची तिकीटे यापूर्वीच विकली गेली आहेत.

# अनन्याने सोडला मोठा चित्रपट



**मुंबई :** अभिनेता कार्तिक आर्यनसोबतच्या 'तू मेरी मैं तेरा मैं तेरा तू मेरी' या आगामी चित्रपटामुळे अनन्या पांडे सध्या चर्चेत आहे. या चित्रपटाच्या प्रमोशन आणि कथानकामुळे तिच्या चाहत्यांमध्ये उत्सुकता वाढली आहे. त्याचबरोबर अनन्या आणखी एका रोमँटिक ड्रामा चित्रपटात दिसणार होती, ज्यामुळे तिच्या करिअरमध्ये आणखी एक मोठी संधी मिळणार होती. मात्र, अनन्या पांडेने आता या चित्रपटातून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामुळे चाहत्यांना आश्चर्य वाटले आहे. हा निर्णय तिने एका ओटीटी प्रोजेक्टच्या व्यस्ततेमुळे घेतला आहे, ज्यामुळे तिच्या शेड्यूलमध्ये बदल करावा लागला. अनन्या 'छूमंतर' या चित्रपटात मुख्य भूमिका साकारणार होती, ज्याची तयारीही सुरू झाली होती. 'मुंज्या' फेम अभिनेता अभय वर्मा हा तिचा सहकलाकार असणार होता, आणि दोघांच्या जोडीकडे प्रेक्षकांची नजर होती. या चित्रपटात अनन्या रोमँटिक दृश्यांमध्ये दिसणार होती, ज्यामुळे तो एक मोठा हिट ठरू शकला असता. परंतु अनन्याने आता या चित्रपटाला पूर्णपणे नकार दिला आहे, आणि तिच्या जागी दुसऱ्या अभिनेत्रीची निवड करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. तिच्या तारखा उपलब्ध नसल्याने हा निर्णय घेण्यात आला असल्याचे समजते, ज्यामुळे उत्पादकांना अडचण निर्माण झाली आहे. ओटीटी वेबसीरिज 'कॉल मी बे'च्या दुसऱ्या सीझनच्या शूटिंगच्या तारखा आणि 'छूमंतर'च्या चित्रिकरणाच्या तारखा एकाच वेळी असल्याने अनन्या पांडेने निवड करावी लागली.



# घटस्फोटाच्या ४ वर्षांनी अभिनेत्री पुन्हा प्रेमात

## रोमँटिक व्हिडीओ शेअर करत दिली नात्याची कबुली

**मुंबई :** नोव्हेंबर २०२५ पासून मनोरंजन सृष्टीत प्रेमाचे वारे वाहताना दिसत आहे. काही लग्न बंधनात अडकले आहेत तर काहींना आपल्या प्रेमाची कबुली दिली आहे. पण कलाकार आपले प्रेम व्यक्त करताना दिसत आहेत. नवीन वर्षाच्या सुरुवातीला प्रसिद्ध अभिनेत्रीने आपल्या प्रेमाची कबुली दिली आहे. तिने सोशल मीडियावर एक रोमँटिक व्हिडीओ पोस्ट केली आहे.

प्रसिद्ध अभिनेत्री कीर्ती कुल्हारीने अभिनेता राजीव सिद्धार्थसोबत एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या दोघांनी 'फोर मोर शॉट्स प्लीज' चा वेब सीरिजमध्ये एकत्र काम केले आहे. कीर्ती आता ४० वर्षांची आहे. तिचा पहिला घटस्फोट झाला आहे. घटस्फोटानंतर ४ वर्षांनी पुन्हा प्रेमात पडली आहे. व्हिडीओत कीर्ती आणि राजीव सिद्धार्थचे अनेक रोमँटिक फोटो पाहायला मिळत आहे. दोघे एकमेकांमध्ये गुंतलेले दिसत आहे. त्यामुळे ही दोघे एकमेकांना डेट करत असल्याची चर्चा सोशल मीडियावर सुरू झाली आहे.

कीर्तीने व्हिडीओला खूप खास कॅप्शन दिलं आहे. तिने लिहिलं की, 'एक चित्र हजार शब्दांच्या बरोबरीचे असते...नवीन वर्षाच्या शुभेच्छा सर्वांना हॅप्पी २०२६...' या पोस्टवर चाहते आणि कलाकार यांच्याकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. व्हिडीओत यांच्या कॉफी डेट्स, कार सेल्फी, एकत्र फिरण्याचे, काम करण्याचे सुंदर फोटो पाहायला मिळत आहे. दोघे एकत्र खूपच खुश आहेत. कीर्ती कुल्हारीचे पहिले लग्न अभिनेता साहिल सहगलसोबत झाले होते. कीर्ती कुल्हारी आणि साहिल सहगलने २०१६ ला लग्नगाठ बांधली आणि २०२१ ला दोघे विभक्त झाले. लग्नाच्या ५ वर्षांनी दोघांनी घटस्फोट घेतला आणि आता कीर्ती कुल्हारीने आपल्या नवीन नात्याला सुरुवात केली आहे.

# सेसफंड योजना; बॅटरी ऑपरेटेड स्प्रेअर्ससाठी अर्ज करण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा परिषद कृषी विभाग यांच्या सेसफंड योजनेअंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी थेट लाभ हस्तांतरण () योजनेतून ७५ टक्के अनुदानावर बॅटरी ऑपरेटेड स्प्रेअर्स (फवारणी यंत्र) पुरविण्यात येणार आहेत. या योजनेअंतर्गत सिंदखेड राजा, देऊळगाव राजा व मोताळा या तालुक्यांचे उद्दिष्ट पूर्ण झाले असून, उर्वरित तालुक्यांमध्ये अद्याप उद्दिष्टपूर्ती झालेली नाही. त्यामुळे उर्वरित तालुक्यातील पात्र व इच्छुक शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदचे कृषि विकास अधिकारी यांनी केले आहे.

योजने संदर्भात अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या तालुक्यातील पंचायत समितीमधील कृषी अधिकारी(सामान्य) तसेच विस्तार अधिकारी (कृषी) यांच्याशी संपर्क साधावा. तसेच विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे दि. २० जानेवारी २०२६ पर्यंत सादर करावेत.

# मागासवर्गीय शेतकरी व महिलांसाठी अनुदान योजना; १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा परिषद समाजकल्याण विभाग यांच्या २० टक्के सेसफंड योजनेअंतर्गत सन २०२५-२६ आर्थिक वर्षासाठी मागासवर्गीय शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर ५ एच.पी. विद्युत मोटार पंप तसेच मागासवर्गीय महिलांसाठी शिलाई मशीन पुरविण्याची योजना राबविण्यात येत आहे. इच्छुक शेतकरी व महिलांनी आवश्यक कागदपत्रासह दि. १५ जानेवारीपर्यंत अर्ज करावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी केले आहे. सदर योजनेसाठीचे अर्ज पंचायत समिती स्तरावर उपलब्ध करून देण्यात आले असून, परिपूर्ण अर्ज व आवश्यक कागदपत्रांसह सादर करण्याचे यापुर्वी कळविण्यात आले होते. तथापि जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळावा या उद्देशाने अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार, मागासवर्गीय शेतकऱ्यांनी ५ एच.पी. विद्युत मोटार पंप योजनेसाठी व मागासवर्गीय महिलांनी शिलाई मशीन योजनेसाठी आपले अर्ज १५ जानेवारी २०२६ पर्यंत संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालयाकडे सादर करावेत. अधिक माहितीसाठी पात्र लाभार्थ्यांनी आपल्या जवळच्या पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन व जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रमोद यंडोले यांनी केले आहे.

# डॉ. गोंधणे स्किन केअर अँड रिसर्च सेंटरचा गौरवशाली यशस्वी प्रवास संपूर्ण महाराष्ट्रात विस्तार



जनसंचलन/बुलढाणा

त्वचारोग उपचार क्षेत्रात विश्वास, सातत्य आणि संशोधनाची मजबूत परंपरा निर्माण करणाऱ्या डॉ. गोंधणे स्किन केअर अँड रिसर्च सेंटरने आपल्या वैद्यकीय सेवेची यशस्वीरित्या पूर्ण केली आहेत. या संस्थेची स्थापना संस्थापक डॉ. शिवप्रसाद गोंधणे यांनी केली असून, त्यांच्या दूरदृष्टी व समर्पणातून ही संस्था आज संपूर्ण महाराष्ट्रभर शाखांचे जाळे उभारणारी अग्रगण्य त्वचारोग संस्था म्हणून ओळखली जाते. पिग्मेंटेशन, मुरुमे, ॲलर्जी, सोरायसिस, एक्झिमा, केसांचे विकार तसेच विविध जुनाट व असाध्य त्वचारोगांवर येथे संशोधनाधारित व परिणामकारक उपचार करण्यात येतात. प्रत्येक रुग्णासाठी वैयक्तिक उपचारपद्धती राबविणे, हीच या सेंटरची ओळख आहे. या यशस्वी प्रवासात आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान, नवे संशोधन आणि अनुभवी डॉक्टरांच्या टीमच्या माध्यमातून महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये व जिल्ह्यांमध्ये शाखा सुरू करण्यात आल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील रुग्णांना दर्जेदार त्वचारोग उपचार त्यांच्या जवळ उपलब्ध होत आहेत. उपचारांबरोबरच त्वचारोगांविषयी जनजागृती, योग्य स्किन केअरचे मार्गदर्शन आणि वैद्यकीय संशोधनाला चालना देण्याचे सामाजिक कार्यही ही संस्था सातत्याने करत आहे. संस्थापक डॉ. शिवप्रसाद गोंधणे यांच्या नेतृत्वाखाली अनुभव, रुग्णांचा अढळ विश्वास आणि संपूर्ण महाराष्ट्रात विस्तारलेले सेवा-जाळे म्हणजेच डॉ. गोंधणे स्किन केअर अँड रिसर्च सेंटर एक प्रेरणादायी यशोगाथा.

# संस्था नोंदणीची कोरी प्रमाणपत्रे चोरीस; गैरवापर टाळण्यासाठी नागरिकांना आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बुलढाणा विभाग बुलढाणा येथे दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी संस्था नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत देण्यात येणाऱ्या संस्था नोंदणी प्रमाणपत्रांपैकी अनुक्रमांक १२१९९८ ते १२२००० ही कोरी प्रमाणपत्रे चोरीस गेली आहेत. या प्रकरणी बुलढाणा शहर पोलीस स्टेशन येथे चोरीबाबत तक्रार दाखल करण्यात आली असून गुन्हा नोंदविण्यात आला आहे. संस्था नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत देण्यात येणारी वरील अनुक्रमांकांची प्रमाणपत्रे वापरून शासकीय किंवा निमशासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधित सर्व कार्यालये, बँका व संस्थांनी दक्षता घ्यावी. सदर अनुक्रमांकांची प्रमाणपत्रे कुणाच्या वापरात आढळून आल्यास, त्यांची तात्काळ उलट तपासणी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बुलढाणा येथे करून घ्यावी किंवा तसे निदर्शनास आल्यास या कार्यालयाच्या निदर्शनास आणून द्यावे, असे आवाहन सहायक धर्मदाय आयुक्त यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे केले आहे.

# ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक वापर मर्यादा शिथिलतेचे दिवस निश्चित...



जनसंचलन/बुलढाणा

ध्वनी प्रदुषण नियमन व नियंत्रण नियम २००० अन्वये ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यांच्या वापरासाठी श्रोतृगृहे, सामुहिक सभागृहे व मेजवाणी कक्ष यासारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी जिल्ह्याच्या निकडीनुसार वर्षामध्ये १५ दिवस निश्चित करून सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत सूट देण्यात येणारे दिवस जाहीर करण्यात आले आहे. ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यांचा वापर ध्वनीची विहीत मर्यादा राखून सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत पुढील वर्षात सुट देण्यात येणारे १३ दिवस जाहीर करण्यात आले आहे. तर उर्वरित २ दिवस राखीव ठेवण्यात येवून महत्वाच्या वेळी व गरज भासल्यास त्या त्या वेळी निश्चित करण्यात येणार आहे. ध्वनी मर्यादेचे व तरतूदींचे उल्लंघन होणार नाही, याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी. उच्च न्यायालयाने वेळोवेळी ध्वनी प्रदुषणासंबंधात दिलेल्या आदेशात नमूद बाबींचे तंतोतंत पालन करावे. न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होणार नाही, याची काळजी घ्यावी, असे जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी कळविले आहे. निश्चित केलेले दिवस : राजमाता जिजाऊ जयंती, शिवजयंती, ईद ए मिलाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, छत्रपती संभाजी महाराज जयंती, गणपती उत्सवातील दुसरा, पाचवा, गौरी विसर्जन व अनंत चर्तुदशी असे चार दिवस, नवरात्री उत्सवाचे अष्टमी व नवमीचा दिवस, लक्ष्मीपूजन व ३१ डिसेंबर २०२६, असे एकूण १३ दिवस निश्चित करण्यात आले असून दोन दिवस राखीव ठेवण्यात आले आहे.

# जिल्ह्यात कृषी प्रक्रिया उद्योग उभारावे - जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आवाहन

## बुलढाण्यात महानिर्यात इग्नाईट कन्व्हेंशन कार्यशाळा उत्साहात...

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात फळपीक, अन्न व कृषी आधारित उद्योग उभारण्यासाठी मोठी संधी उपलब्ध असून शेतकरी, युवक-युवती, महिला बचत गट, नवउद्योजक व शेतकरी उत्पादक कंपन्यांनी या संधीचा लाभ घेत प्रक्रिया उद्योग उभारुन निर्यात वाढवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. जिल्हा निर्यात प्रचालन समिती आणि उद्योग संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने बुलढाणा अर्बन रेसिडेन्सी क्लब येथे आयोजित महा निर्यात इग्नाईट कन्व्हेन्शन २०२६ अंतर्गत विशेष कार्यशाळा शुक्रवारी उत्साहात पार पडली. या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते झाले. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील पुढे म्हणाले की, राज्य शासनाने १ ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट ठेवून उद्योग व निर्यात वाढीसाठी प्रधानमंत्री रोजगार निर्मिती व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम यासारख्या योजना सुरु केल्या आहेत. जिल्ह्यात फळपीक प्रकिया, बिजोत्पादन, भाजीपाला, औषध निर्मिती, अन्न प्रक्रिया उद्योग उभारण्याची मोठी संधी आहे. त्यासाठी भरीव अनुदानही दिले जाते. जिल्हा प्रशासनानेही पारंपरिक पिकांसह फळबाग लागवड, भाजीपाला, बिजोत्पादन, सफेद मुसळी उत्पादन, औषध निर्मिती, पर्यटन क्षेत्राला प्राधान्य दिले असून या क्षेत्रात नवीन उद्योग सुरु करण्यासाठी इच्छूकांना सहकार्य करण्याची भूमिका जिल्हा प्रशासनाने घेतली आहे. मैत्री पोर्टलच्या माध्यमातून नवीन उद्योगासाठी अर्ज व विविध परवानग्या दिल्या जात आहे. तसेच फळबाग व भाजीपाला लागवड, बिजोत्पादनासाठी रोजगार हमी योजनेचा लाभ देखील दिला जात आहे. त्यामुळे शेतकरी, युवकयुवती, उद्योजक, निर्यातदारांनी संधी असलेल्या क्षेत्राला प्राधान्य देवून जिल्ह्यातील उत्पादनाची जास्तीत जास्त निर्यात करावी आणि जिल्ह्याचे नावलौकीक करावे, असे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले. औद्योगिक निर्यात क्षेत्रात बुलढाणा जिल्ह्याची भरीव प्रगती झाली असून गेल्या आर्थिक वर्षात जिल्ह्यातून ८७४ कोटी रुपयांची निर्यात करण्यात आली आहे. सलग तीन वर्षांपासून बुलढाणा जिल्हा अमरावती विभागात निर्यातीत अव्वल ठरला आहे. चालू वर्षात ही निर्यात १५०० कोटी रुपयांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून सर्व घटकांनी त्यासाठी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. या कार्यशाळेत निर्यातदार सुमीत चौधरी आपले अनुभव विषद केले. तसेच स्टेट बँक ऑफ इंडियाच्या फॉरेक्स शाखेच्या व्यवस्थापकांनी बँकेच्या प्रक्रिया, सुविधांविषयी माहिती दिली. यासोबतच मैत्री ॲक्ट, अर्ज व परवानग्यासाठी मैत्री पोर्टल, एक खिडकी योजना आणि तक्रार निवारण प्रणालीबाबत विजय शिंदे यांनी माहिती दिली. तसेच न्यू इंडिया अश्यूरंस कंपनीमार्फत बीमा साथी या योजनेविषयी माहिती देण्यात आली. या कार्यशाळेच्या प्रास्ताविकात महाव्यवस्थापक प्रमोद लांडे यांनी जिल्ह्याच्या निर्यात क्षेत्रातील कामगिरीविषयी माहिती दिली. तर व्यवस्थापक सुनील पाटील यांनी राज्य शासनाच्या नवीन औद्योगिक धोरणाची माहिती दिली. या कार्यशाळेला जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे, उद्योग सहसंचालक रंजना पौळ, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे, डिजीएफटीचे रितेश ठाकूर, निर्यातदार सुमीत चौधरी, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक के के सिंग, व्यवस्थापक सुनील पाटील, सीए रितेश गुप्ता, अंकित गुप्ता, जिल्ह्यातील निर्यातदार, नवउद्योजक तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांचे आणि बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.




# स्किल व्यवसायिकांचा सीएई कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न.....

**जनसंचलन/ बुलढाणा**

स्किल ॲक्युपंक्चर कॉलेज व हॉस्पिटल बुलढाणा येथे दिनांक २७ १२ २०२५ रोजी ॲक्युपंक्चर व्यावसायिकांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीमध्ये श्री नारायण नवले प्रबंधक महाराष्ट्र ॲक्युपंक्चर कौन्सिल मुंबई, डॉक्टर सचिन सुपे अध्यक्ष स्किल बहुउद्देशीय संस्था बुलढाणा, डॉक्टर त्रिदीप गुहा अध्यक्ष आयुष्मान ॲक्युपंचर कॉलेज नागपूर कामठी, श्री बाबू पाटेकर एमसीए प्रतिनिधी, डॉक्टर दीपक शेवाळे साई ॲक्युपंक्चर कॉलेज व हॉस्पिटल केळवण, डॉक्टर नितीन पाटील व्हाईस प्रेसिडेंट आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, तसेच तज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री उमेश पळशीकर तज्ञ मार्गदर्शक, डॉक्टर स्मिता खारकर, सौ प्राची देसाई, तसेच डॉक्टर छाया कंकाळ जीवने, डायरेक्टर स्किल अबॅकस क्रिएटिव्ह प्रायव्हेट लिमिटेड, प्राचार्या चैताली पाटील स्किल पॅरामेडिकल कॉलेज बुलढाणा, प्राचार्या जयश्री सुपे खामगाव पॅरामेडिकल कॉलेज खामगाव. कार्यक्रमाची सुरुवात माननीय नारायण नवले साहेब यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने व सरस्वती मातेच्या पूजनाने करण्यात आली त्यानंतर प्रमुख उपस्थित पाहुण्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकामध्ये डॉक्टर सचिन सुपे सर यांनी आपल्या कार्यक्रमाची रूपरेषा मांडली, त्यामध्ये ॲक्युपंक्चर ही अत्याधुनिक व प्राचीन थेरपी आहे त्यामध्ये वेगवेगळे आजारावर कुठल्याही प्रकारची शारीरिक हानी न होता रुणांच्या इलाज केला जातो. महाराष्ट्रामध्ये १३ शासनमान्य कॉलेज मधून आपले कॉलेज ची निवड करण्यात आली आहे , आपल्या कॉलेजचे ॲक्युपंक्चर प्रॅक्टिशनर रुग्णांना सेवा देण्यासाठी सज्ज होणार आहेत. यानंतर आदरणीय श्री नारायण नवले सर यांनी आपल्या भाषणामधून असे सांगितले की एका वर्षभरात ५८ वी घेण्यात आली. देशातील पहिले महाराष्ट्र राज्य आहे की ज्या ठिकाणी ॲक्युपंक्चर अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली. विधिमंडळामध्ये दोन्ही सभागृहातून या अभ्यासक्रमाची निवड करण्यात आली. ॲक्युपंचरिस्ट यांचे भविष्य उज्वल आहे यासाठी त्यांनी अधिकाधिक ज्ञान मिळवून आपली ख्याती पसरवावी. या सी ए ई कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातूनच नव्हते तर भारतातून ॲक्युपंचारिस्ट आले होते. ॲक्युपंक्चर कार्यशाळेमध्ये प्रॅक्टिशनर यांना महाराष्ट्र कौन्सिल ऑफ ॲक्युपंक्चर यांच्याकडून सहभागीॲक्युपंक्चर प्रॅक्टिशनर या दोन पॉईंट तसेच कौन्सिल प्रमाणपत्र उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. ॲक्युपंक्चर कार्यशाळेमध्ये प्रॅक्टिशनर यांना First Aid, Needling, Indomnia Theory, what are muscle meridian, Needling practicals, Indomnia practicals, point selection, clinical application, या विषयावर तज्ञांनी मार्गदर्शन केले व रुग्णावर प्रत्याक्षिक करून दाखविल या या कार्यशाळेसाठी महाराष्ट्रातून वेगवेगळ्या जिल्ह्यातून तज्ञ, प्रॅक्टिशनर डॉक्टर यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला सहभाग नोंदविला.





अशाच प्रकारे कार्यक्रम व आरोग्य शिबिरे स्किल कॉलेज व हॉस्पिटल मार्फत वेळोवेळी राबविल्या जातील असे या कार्यक्रमातून डॉक्टर सचिन सुपे सर यांनी सांगितले तसेच तरुण पिढी यांनी रुग्णसेवेच्या दृष्टिकोनातून डिप्लोमा इन ॲक्युपंक्चर थेरपीस्ट या अभ्यासक्रमासाठी युवक युवती यांनी बारावी उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊन आपले भविष्य उज्वल करण्याची संधी रुग्ण सेवा करण्याची संधी या माध्यमातून प्राप्त करता येईल. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी प्राध्यापक संजय सोनोने, प्राध्यापक उमेश साळवे, प्राध्यापक रविकिरण पाटील, प्रा. कोमल लटके, प्रा. प्रतिभा जाधव, प्रा. प्रियंका साळवे, श्री गजानन कंकाळ, दिगंबर खंडागळे, अनिकेत बढे, प्रा. शुभम सुरडकर, पुष्पा सोनुने, शिल्पा जाधव, सोनाली गवई, भूषण बैरागी, लक्ष्मी ढोके, सुनील थेटे तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभम सोरमारे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राध्यापक उमेश साळवे सर यांनी केले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे
दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८